आतील पानात वाचा
- न्या.भूषण गवई आणि त्यांचे विचार...!
- तू स्त्रियांच्या विषयावर का बोलतो ?
- कलगी तुऱ्याचा जल्लोष; गौरी गणेश जाखडी नृत्य स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद...

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : ११६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.०९ डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# महायुतीतीलच एका पक्षाचे २२ आमदार मुख्यमंत्र्यांच्या गळाला, आदित्य ठाकरेंचा दावा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, नागपूर :** सरकारमधील एका गटाचे २२ आमदार मुख्यमंत्र्यांच्या गळाला लागले आहेत, असा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी सोमवारी नागपुरातील विधानभवन परिसरात प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना केला. सत्ताधारी पक्षातूनच दोन विरोधी गट तयार होण्याची भीती मुख्यमंत्र्यांना आहे, त्यामुळे विरोधी पक्षनेतेपद सध्या रिकामे आहे. विरोधी पक्षनेतेपदाच्या प्रस्तावामध्ये कुठलाही बदल झालेला नाही. अशा अफवांवर कुणीही विश्वास ठेवू नये. सत्तेमध्ये सध्या एक पक्ष दोन गट आहेत. त्यातील एका गटाचे २२ आमदार मुख्यमंत्र्यांच्या हाती लागले आहेत. गेल्या एका वर्षाचा अभ्यास केला असता ही मंडळी उठ म्हटले तर उठतात आणि बस म्हटले तर बसतात. ते मुख्यमंत्र्यांच्या इशारावर नाचताहेत, असा हल्लाबोल आदित्य ठाकरेंनी केला आहे.

उद्धव ठाकरे हे इंडिगोच्या विमानाने येत नाहीत, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. या पार्श्वभूमीवर आदित्य ठाकरे म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी केलेली टीका इंडिगोमुळे सामान्य प्रवाशांना झालेल्या त्रासाची थट्टा उडविण्यासाठी होती की त्या मुद्यावरून लक्ष विचलित करण्यासाठी, याचा विचार करायला हवा. काल स्वत: मुख्यमंत्री चार्टर विमानाने आले. त्यांचे विमान दोनवेळा मुंबईला गेले. दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच भाजपचे आमदार चार्टर विमानाने आलेत. नुकत्याच झालेल्या नगरपंचायतच्या निवडणुकांमध्ये मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री प्रचारासाठी हेलिकॉप्टरने फिरलेत. ते गाडीने का फिरले नाहीत. एका उपमुख्यमंत्र्यांच्या गावी जायला रस्ता नाही पण तिथे हेलिकॉप्टर जातो. ते आत्ताच्या निवडणुकांमध्ये हेलिकॉप्टरने बॅगा भरून कुठला आनंदाचा शिधा वाटत होते, याचे उत्तर मिळायला हवे. प्रचारात काही तासांसाठी जातात आणि मोठाल्या बॅगांमधून आनंदाचा शिधा वाटतात. २०१४ पूर्वी वेगवेगळ्या एअरलाइन्य कंपन्या कार्यरत होत्या. त्यानंतर या कंपन्या संपविण्यात आल्या.



त्यामुळे एका कंपनीची मक्तेदारी झाली आहे. केंद्र सरकारचेदेखील ही कंपनी ऐकत नाही. त्यावर सरकारसुद्धा काही करत नाही, असं म्हणत आदित्य ठाकरेंनी सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला आहे. दरम्यान, शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत, पण सरकार अधिवेशनबाबत गंभीर नाही. त्यामुळेच अधिवेशनाचा कालावधी कमी ठेवण्यात आला आहे. सरकारची नजर केवळ पैशांवर आहे, असा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला.

**•विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा विनाश...**

नाशिकमध्ये तपोवन, मुंबईमध्ये संजय गांधी उद्यान येथे वृक्षतोड होणार आहे. नागपूरमध्ये अजनीवन संपविण्याचा प्रयत्न होता. मी मंत्री असताना ते काम थांबविले होते. महामार्ग, बोगदे, रोपवे आदींच्या नावावर पर्यावरणाचे नुकसान कसे करायचे हे भाजपला चांगले माहिती आहे. ताडोबामध्ये खनिकर्म सुरू होणार आहे. मेळघाटची वाट लावली आहे. विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा विनाश सुरू आहे, अशी टीकाही आदित्य ठाकरे यांनी केली आहे.

## विनोद गोरे यांना कलगी तुरा आदर्श संपादक पुरस्कार २०२५ प्रदान



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, ठाणे :** लोकशाहीच्या पटलावर अल्पावधीतच जनमानसात अढळ स्थान निर्माण करून पत्रकारितेत विश्वासार्हताची अमिट मोहर उमटवली असे दैनिक अक्षराज मीडियाचे मुख्य संपादक विनोद गोरे यांना शाहिरी परंपरेतील महाराष्ट्राच्या कलाप्रवाहात गेली ६५ वर्षे अविरत कार्यरत असणाऱ्या कलगी तुरा समाज उन्नती मंडळ –मुंबई (रजि) महाराष्ट्र, संस्थेच्या वतीने कलगी तुरा 'आदर्श संपादक पुरस्कार २०२५' ने गौरविण्यात आले. रविवार दिनांक ०७ डिसेंबर २०२५ रोजी भारतरत्न लता मंगेशकर नाट्यगृह, मिरारोड येथे कलगी तुरा समाज उन्नती मंडळ आयोजित गौरी गणेश नृत्य स्पर्धा २०२५ व कलगी तुरा दिनदर्शिका –२०२६ प्रकाशन कार्यक्रमाच्या भव्यदिव्य सोहळ्यात संस्थेचे अध्यक्ष सुरेश ऐनारकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख अतिथी प्रमिल पत्याने उद्योजक यांच्या हस्ते सदर पुरस्कार दैनिक अक्षराज संपादक विनोद गोरे यांच्या वतीने दैनिक अक्षराज मीडियाचे ठाणे जिल्हा प्रतिनिधी जे.के.पोळ व ठाणे/गुहागर प्रतिनिधी उदय दणदणे यांच्या वतीने स्वीकारण्यात आला. विनोद गोरे गेली ८ वर्षे निर्भीडपणे पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून दैनिक अक्षराज मीडियाच्या माध्यमातून समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत सामाजिक प्रश्नी न्याय मिळवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहेत.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार, २० वर्षांची शिक्षा !

**अक्षराज : शिवराज मुगळे**



**दि.०८, सोलापूर :** अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी विशेष न्यायाधीश डी. एन. सुरवसे यांनी – आरोपीस २० वर्षे कठोर कारावास व २० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. अंबादास लक्ष्मण गावडे (वय ३६, रा. मंद्रूप ता. दक्षिण सोलापूर) असे शिक्षा झालेल्या तरुणाचे नाव आहे. याबावत पीडितेच्या नातेवाइकांनी दिलेल्या फिर्यादीवरून मंद्रूप – पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पीडित ही ३ मे २०२० रोजी घरातून निघून गेल्याने तिच्या नातेवाईक तिचा शोध घेतला असता, ती गावडे याच्या घरातून येताना दिसली. कुटुंबीयांना संशय आल्यानंतर त्यांनी मंद्रूप,विश्वासात घेऊन पीडितेला विचारले. तिने सांगितले की, अंबादासने घरात बोलावून 'तुझ्या घरच्यांना मारून टाकीन' अशी धमकी देत दुष्कर्म केले, याबाबत मंद्रूप पोलिसांत गुन्हा नोंदवण्यात आला होता. पोलिस उपनिरीक्षक गणेश पिंगुवाले यांनी आरोपीला अटक करून तपास केला. न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

त्याची सुनावणी विशेष न्यायाधीश सुरवसे यांच्यासमोर झाली. साक्षीदारांच्या साक्षी व सरकारी वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायाधीश सुरवसे यांनी आरोपीला गावडे याला २० वर्षे कठोर कारावास व २० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. याप्रकरणी सरकारच्या वतीने ॲड. शीतल डोके यांनी काम पाहिले. कोर्टभैरवी म्हणून पोलिस उपनिरीक्षक विजयकुमार जाधव, प्रिया जाधव, पोलिस शिपाई पूजा काळे, अनिता काळे यांनी काम पाहिले.


## 'गोवा अग्नितांडवा' च्या घटनेवर ठाण्यात राजकारणाचा 'भडका'

### मनसे आणि भाजप ॲक्शन मोडवर...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, ठाणे :** उत्तर गोव्यात गर्दीने भरलेल्या नाइटक्लबला शनिवारी मध्यरात्रीनंतर लागलेल्या भीषण आगीत २५ जणांचा मृत्यू झाला. तर सहा जण जखमी झाले. डान्स फ्लोअरजवळ फोडलेल्या फटाक्यांमुळे ही आग लागल्याचे प्राथमिकरित्या केलेल्या चौकशीत समोर आले. ठाण्यातही विविध मॉल, वाणिज्य गृहसंकुल, मानपाडा येथील कोठारी कंपाउंड, हिरानंदानी इस्टेट, मेडोज, वागळे इस्टेट परिसरातील अवैद्य लाउंज आणि हुक्का पार्लरमध्ये तसेच हॉटेल, रेस्टॉरंट, डान्सबार याठिकाणी अग्निशमन दलाची कोणतीच परवानगी न घेता पहाटेपर्यंत धांगडधिंगा सुरु असतो. या आस्थापनांवर ठाण्यात कारवाईची मागणी मनसे आणि भाजपने पालिका आयुक्त सौरभ राव यांच्याकडे केली आहे.

उत्तर गोव्यात डान्स फ्लोअरवर नृत्याचा कार्यक्रम सुरू असताना अचानक आग लागल्याने आगीचा भडका उडाल्यानंतर लोक सैरावैरा पळू लागले. अनेक जण तळमजल्यावर आणि स्वयंपाकघरात अडकले होते. या ठिकाणी एका तात्पुरत्या बांधकामाने सहज पेट घेतल्याने आग पसरत गेली आणि काही वेळातच संपूर्ण क्लब आगीत जळून खाक झाला. ठाण्यात महापालिका प्रशासन, अग्निशमन दल, अन्न



व औषध प्रशासन, राज्य उत्पादन शुल्क खात्यासह पोलीस प्रशासनातील अधिकार्यांच्या संगनमतपूर्वक हेतूमुळे अशा आस्थापनांमध्ये अग्नितांडव होण्याची भीती आहे. तसेच या परिसरात अवैधरित्या होणार्या तात्पुरत्या बांधकामाने गोवा अग्निकल्लोळ दुर्घटनेची पुनरावृत्ती निश्चितच होऊ शकते. हे प्रकार टाळण्यासाठी प्रशासनाकडून कठोर कारवाई आवश्यक आहे, मनसेचे ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांनी आयुक्त राव यांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे.

ठाणे शहरातील शाळा–महाविद्यालये, हॉटेल, क्लब, मॉल, आयटी पार्क आणि सरकारी कार्यालयांचे फायर ऑडिट करावे. तसेच सध्या फायर एनओसी नसलेल्या आस्थापनांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी भाजपचे माजी गटनेते नारायण पवार यांनी आयुक्त राव यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

**नववर्ष स्वागत पार्ट्यांवर सावट, येत्या काळात नववर्ष...**

स्वागतादरम्यान होणाऱ्या पार्ट्यांमध्ये असे अग्नितांडव घडण्याची शक्यता आहे. सर्तकता बाळगत तात्काळ या आस्थापनांवर कारवाई करावी. अन्यथा, मनसे स्टाईलने याठिकाणी तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा मनसेच्या जाधव यांनी दिला आहे. तर ठाणे शहरातही सतर्कता बाळगण्याची आवश्यकता आहे. यापूर्वी शहरात हॉटेलला लागलेल्या आगीत काही ग्राहकांचा मृत्यू झाला होता. तर कापूरबावडी येथील वाणिज्य इमारत आगीत खाक झाली होती. वाढत्या अतिक्रमणांमुळे ठाणे शहरातील काही भागात अग्निशमन दलाची गाडी पोहचू शकत नाही, अशी स्थिती असल्याचा आरोप भाजपच्या पवार यांनी केला आहे.

## धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी हेक्टरी २० हजार बोनस जाहीर करा : आ. मुनगंटीवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०८, चंद्रपूर :** अवकाळी पावसाने हादरलेल्या धान उत्पादक शेतकऱ्यांना चालू हंगामात तात्काळ आर्थिक दिलासा मिळावा यासाठी प्रति हेक्टरी २० हजार रुपये बोनस जाहीर करावा, अशी मागणी राज्याचे माजी मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणात झालेले पीकनुकसान आणि त्यातून शेतकऱ्यांवर आलेले आर्थिक संकट लक्षात घेऊन ही मागणी अत्यंत महत्वाची असल्याचे माजी मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठीशी नेहमीच खंबीरपणे उभे राहत असल्याने शेतकरी बांधव सरकारकडून आशावादी आहे. मागीलवर्षी नोंदणीकृत धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २० हजार रुपये धान बोनस देण्याच्या माझ्या विनंतीस मान देत, आपण धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी तात्काळ बोनस जाहीर करावे, असे आ. मुनगंटीवार यांनी पत्रात नमूद केले आहे.



चालू वर्षातील सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे धान उत्पादक शेतकऱ्यांचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक कुटुंबासमोर आर्थिक अनिश्चिततेचे संकट उभे राहिले असून, शेतकरी अडचणीत सापडला आहे. त्यामुळे यंदाही बोनस जाहीर करणे अत्यावश्यक आहे.

नागपूर हिवाळी अधिवेशनात नोंदणीकृत धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी प्रति हेक्टरी २० हजार रुपये बोनस जाहीर करावा, अशी राज्यभरातून सातत्याने मागणी होत आहे. अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानीचा विचार करुन शेचकऱ्यांना तातडीचा दिलासा देण्यासाठी संबंधित विभागांना योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणीही आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्र्यांना केली आहे.

## ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांचं निधन

**दि.०८, पुणे :** ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांचं निधन झालं आहे. बाबा आढव हे कष्टकरी आणि श्रमिकांचे नेते म्हणून ओळखले जाणारे नेते होते. बाबा आढाव गेल्या काही दिवसांपासून आजारी होते. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु होते. पण उपचारादरम्यान त्यांची आज प्राणज्योत मालवली. बाबा आढाव यांचं आज रात्री ८.२५ वाजता निधन झालं. त्यांच्या निधनमुळे असंघटित कामगारांचा आवाज बुलंद करून त्यांच्या न्याय हक्कांसाठी लढणारा नेता हरपला अशी भावना सर्वसामान्यांमधून व्यक्त होत आहे.

बाबा आढाव खऱ्या अर्थाने संघर्ष करणारे नेते होते. त्यांनी गेल्यावर्षी ईव्हीएमच्या विरोधात आत्मक्लेश आंदोलन केलं होतं. वयाच्या ९५ व्या वर्षी त्यांनी सलग तीन दिवस ईव्हीएमच्या विरोधात आत्मक्लेश आंदोलन केलं होतं. विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर अनेकांनी ईव्हीएमवर टीका केली होती.



त्यानंतर बाबा आढाव यांनी महात्मा फुले यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधत महात्मा फुले वाडा येथे आत्मक्लेश उपोषण सुरु केलं होतं. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते पाणी पिवून त्यांनी आपलं उपोषण सोडलं होतं. त्यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, जयंत पाटील, संजय राऊत या नेत्यांनी त्यांची भेट घेतली होती.




## भ्रष्टाचार देशाला लागलेली किड

आज ९ डिसेंबर, आजचा दिवस संपूर्ण जगात भ्रष्टाचार विरोधी दिन म्हणून साजरा केला जातो. भ्रष्टाचार ही आज जगातील सर्वात मोठी समस्या बनली आहे. भारतातच नाही तर जगात भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघडकीस येत आहे. जगात असा एकही देश नाही जिथे भ्रष्टाचार होत नाही. भारतात तर भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे. जगातील सर्वाधिक भ्रष्ट देशांच्या यादीत भारताचा क्रमांक लागतो ही खेद जनक बाब आहे. भ्रष्टाचाराची ही किड भारतात खोलवर रुजली आहे. भ्रष्टाचाराची ही किड देश पोखरत चालली आहे. भारतातील भ्रष्टाचार कमी करणार असे सर्वच राजकीय पक्ष सांगतात. देशातील भ्रष्टाचार संपवणार अशी भीष्म प्रतिज्ञाच काही राजकीय आणि सामाजिक नेत्यांनी केली होती पण देशातील भ्रष्टाचार संपवणे तर दूरच पण देशातील वाढता भ्रष्टाचार कमी करणे देखील यांना जमले नाही. अमेरिकेतील वॉशिंग्टन येथील ग्लोबल फायनांशियल इंटिग्रेटी या भ्रष्टाचारावर सर्व्हे करणाऱ्या संस्थेने मागील वर्षी एक अहवाल सादर केला होता. या अहवालानुसार गेल्या सत्तर वर्षात लाचखोरीमुळे देशाचे ४५० अब्ज डॉलरचे नुकसान झाले आहे. ४५० अब्ज डॉलर ही काही कमी रक्कम नाही. भ्रष्टाचारी लोकांनी देशाचे ४५० अब्ज डॉलर पचवले. हे ४५० अब्ज डॉलर गोरगरिबांच्या मेहनतीचे होते मात्र भ्रष्टाचाऱ्यांनी खुर्ची आणि पदाचा गैरवापर करून गोरगरिबांना फसवले आणि त्यांच्या मेहनतीचे पैसे लाटले. देशाला लागलेली भ्रष्टाचाराची ही किड काही आज लागलेली नाही. देशाच्या स्वातंत्र्यापासून भ्रष्टाचार सुरू आहे. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू एकदा उद्विग्न होऊन म्हणाले होते की भ्रष्टाचाऱ्यांना सुळावर लटकवले पाहिजे. मात्र आजवर एकाही भ्रष्ट अधिकाऱ्याला किंवा नेत्याला सुळावर लटकावणे तर दूरच पण मोठी शिक्षा झाल्याचेही ऐकिवात नाही. विशेष म्हणजे ज्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना किंवा नेत्यांना लाचखोरी किंवा भ्रष्टाचारासाठी अटक होते ते नेते किंवा अधिकारी पुन्हा काही दिवसांनी त्याच खुर्चीवर विराजमान झाल्याचे पाहायला मिळतात. अटक होऊन काही दिवसांची शिक्षा भोगूनही भ्रष्टाचारी पुन्हा त्याच खुर्चीवर बसत असल्यानेच भ्रष्टाचार कमी होत नाही. भ्रष्टाचारी समजात उजळ माथ्याने फिरत असतात कारण त्यांना कायद्याची भीती आणि मनाची चाड नसते. दररोजचे वर्तमानपत्र वाचा त्यात तुम्हाला एकतरी लाचखोरीची किंवा भ्रष्टाचाराची बातमी वाचायला मिळेलच. एका एका अधिकाऱ्यांकडे कैक कोटींची अवैध मालमत्ता आढळत आहे. असा एकही विभाग नाही ज्यात भ्रष्टाचार होत नाही. महसूल आणि पोलिस विभाग भ्रष्टाचारात अव्वल असले तरी सर्वच विभागात भ्रष्टाचार सर्रास सुरू आहे. आता तर शिक्षणासारखे पवित्र क्षेत्र देखील भ्रष्टाचाराने बरबटले आहे. जो विभाग समाजाला नैतिकतेचे धडे देतो त्याच विभागात भ्रष्टाचारासारखे अनैतिक काम राजरोसपणे चालू आहे. देशातील भ्रष्टाचार कमी व्हावा यासाठी समाजसेवक अण्णा हजारे, योग गुरू बाबा रामदेव यांच्यासह हजारो कार्यकर्ते दिल्लीच्या जंतरमंतर वर उपषणाला बसले होते. त्यांच्या आंदोलनाला जनतेतूनही मोठा पाठिंबा मिळाला होता. आता सत्तेत असलेल्या भाजपनेही त्या आंदोलनाला पाठिंबा दिला होता. देशभर भ्रष्टाचार विरोधी वातावरण निर्माण झाले होते. त्यावेळी देशातून भ्रष्टाचार कमी होईल असे वाटले होते मात्र भ्रष्टाचार तसूभरही कमी झाला नाही. विशेष म्हणजे त्या आंदोलनाचे नेतृत्व करणारे एक नेते आज भ्रष्टाचार केला म्हणूनच जेलमध्ये आहेत. त्या आंदोलनाचा सर्वाधिक फायदा भाजपला झाला. भाजप केंद्रात सत्तेवर आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ना खाउंगा... ना खाने दुंगा... असा सज्जड दम भ्रष्टाचाऱ्यांना दिला. देशातील भ्रष्टाचार कमी करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नोटबंदी केली. लोकांना वाटले आता तरी भ्रष्टाचार कमी होईल पण तसे झाले नाही उलट भ्रष्टाचारात वाढच झाली. त्यातही गंमत म्हणजे ज्या भ्रष्टाचाऱ्यांना विरोध करून भाजप सत्तेत आली आज त्याच भ्रष्टाचाऱ्यांना पक्षात घेऊन भाजप पावन करत आहे. ट्रेस मेट्रिक्स २०२१ च्या अहवालात भारत लाचखोरीत इतर देशांच्या तुलनेत खूप पुढे आहे.

याचाच अर्थ देशातील भ्रष्टाचार कमी झालेला नाही उलट वाढलाच आहे. आज कोणत्याही कार्यालयात चिरीमिरी दिल्याशिवाय काम होत नाही. जनताही मजबूर आहे. याच मजबुरीचा फायदा घेऊन भ्रष्टाचारी त्यांना जाळ्यात अडकवत आहेत. लाच दिली नाही तर काम होत नाही असाच अनुभव देशातील बहुतांशी जनतेला आला आहे. राजस्थानातील ८० टक्के लोकांनी हे मान्य केले आहे की कोणतेही काम करण्यासाठी लाच द्यावीच लागते. महाराष्ट्रातील ५५ टक्के लोकांचेही हेच म्हणणे आहे. याचाच अर्थ लाचखोरी सामान्य होत आहे. पूर्वी भ्रष्टाचाऱ्यांकडे द्वेष भावनेने पाहिले जायचे आता मात्र त्यांच्या संपत्तीवरून त्यांचा सन्मान होत आहे. आज भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे.

# न्या.भूषण गवई आणि त्यांचे विचार...!!



शासकीय नोकऱ्या, शैक्षणिक प्रवेश यामधील आरक्षण हा विषय अलीकडे अतिशय संवेदनशील बनत असताना नुकतेच निवृत्त झालेले सरन्यायाधीश भूषण गवई यांनी एक महत्वाचा मुद्दा मांडला आहे. त्यावरून त्यांच्यावर आरक्षणाचा लाभघेणाऱ्या अनेकांकडून टीका करण्यात आली.

न्या. गवई यांनी असे आवाहन केले आहे की, आजवर आरक्षणाचा लाभ घेऊन जे आता सुस्थापित झाले आहेत. ज्यांची शैक्षणिक आणि आर्थिक परिस्थिती सुधारली आहे, त्यांनी आता त्या आरक्षणाचा फायदा अजूनही मागास राहिलेल्यांना मिळावा, म्हणून स्वतःहून आपल्याला मिळणारे लाभ सोडून द्यायला हवेत. थोडक्यात, ज्यांची परिस्थिती आता ता सुधारली आहे, त्यांनी आरक्षण घेऊ नये. न्या. भूषण गवई यांचे हे विधान धाडसी म्हणावे लागेल. कारण सध्या आरक्षण मिळवण्यासाठी समाजातील विविध समाज घटकांची स्पर्धा सुरू असताना ते सोडून देण्याचे आवाहन करणे हे खरोखरच धाडसाचे आहे.

त्यात पुन्हा भूषण गवई हे मागास समाजातून येत असल्यामुळे त्यांनी असे विधान करणे म्हणजे स्वतःच्या बांधवांचे ते नुकसान करत आहेत, असाच त्यांच्यावर काहींचा रोष आला. न्या. गवई यांनी सरन्यायाधीशपदाच्या उत्तरकालात क्रिमी लेअरचा मुद्दा मांडण्यास सुरूवात केली. क्रिमी लेअर म्हणजे जे मागासवर्गीय आरक्षणाच्या लाभामुळे सुस्थापित झाले आहेत, असा वर्ग. त्यांनी आता आरक्षण सोडून त्यांच्याही पलीकडे जे मागास आहेत, त्यांच्यापर्यंत लाभ पोहोचू देणे आवश्यक आहे. न्या. गवई यांच्या या आवाहनाबद्दल यांचे स्वागतच करायला हवे.

डॉ.बाबासाहेब आंबडेकर यांनी राज्यघटनेत जे जातीय आणि आर्थिकदृष्ट्या मागास आहेत, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळावी म्हणून त्यांच्यासाठी आरक्षणाची तरतूद केली होती. पण ही तरतूद विशिष्ट काळासाठी होती. एखादा माणूस आरक्षणाचा लाभ घेऊन सुस्थापित झाला की, त्याला त्या आरक्षणाची गरज राहत नाही, त्यामुळे ते आरक्षण तो सोडून देईल, त्यानंतर ज्यांना ते मिळाले नाही, त्यांना ते मिळेल, असे करून सगळा मागास वर्ग हा मुख्य प्रवाहात येईल, त्यानंतर आरक्षणाची गरज राहणार नाही, असे बाबासाहेबांना वाटत होते.

पण मोठ्या विचारवंतांनी समाजाचे व्यापक हित डोळ्यासमोर ठेवून मांडलेला विचार जेव्हा अंमलबजावणीच्या पातळीवर येतो, तेव्हा त्याचे स्वरुप इतके बदलून जाते की, तो विचारवंत जिवंत असेल तर त्यालाच त्याचे आश्चर्य वाटून मी काय विचार केला होता आणि काय झाले, यावरून स्तब्ध होण्याची वेळ यावी. मार्क्सवादाचे बदललेले स्वरुप पाहून स्वतः कार्ल मार्क्स म्हणाला होता, मी मार्क्सवादी नाही. सध्या आरक्षणावरून विविध समाज घटकांमध्ये फक्त महाराष्ट्रात नव्हे तर देशातील विविध राज्यांमध्ये जी स्पर्धा सुरू आहे, ती पाहिल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना काय वाटले असते, याचा विचार केलेला बरा. आरक्षण पोहायला शिकताना पोहणारा पाण्यात बुडू नये, म्हणून त्याच्या पाठीला बांधलेल्या हवेच्या फुग्यासारखे असते. एकदा तो माणूस पोहायला शिकला की, नंतर त्याने तो फुगा सोडून द्यायला हवा, कारण सुरक्षित वाटते म्हणून त्याने तो फुगा तसाच बांधून ठेवला तर तो त्याच्या वेगवान पोहण्यात अडथळा ठरत असतो, हे तो फुगा बांधून ठेवणाऱ्याने लक्षात घ्यायला हवे. पण एखादी फायद्याची मिळालेली गोष्ट सोडणे फार अवघड असते.

न्या. भूषण गवई यांनी मागासवर्गीयांनी क्रिमी लेअरच्या नियमाचे पालन करावे, असे केलेले आवाहन तळागाळातील मागासवर्गीयांच्या विकासासाठी हिताचे आहे. आपल्याला मिळालेल्या लाभातून आपण एकदा श्रीमंत झालो की, ते लाभआपल्यापेक्षा जे खाली आहेत, त्यांच्यापर्यंत पोहोचू न देता ते आपल्याकडे साठवून ठेवणे आणि आपली मक्तेदारी तयार करणे हा मनुष्य स्वभाव असतो. त्यामुळे खालच्या लोकांपर्यंत सुविधा पोहोचत नाहीत, त्यामुळे ते मागासच राहतात. त्यामुळे जसा एका बाजूला लाभांमुळे नवश्रीमंत वर्ग तयार होतो, तसा दुसऱ्या बाजूला अतिगरीब वर्ग तयार होतो. म्हणजे मागासांमध्ये विषमता तयार होते. आताही एक असे निरीक्षण आहे की, आरक्षणाचा लाभ घेण्यामध्ये मागासांमधील विशिष्ट जातींचे लोक पुढे आहेत, बाकीच्या जाती बऱ्याच मागे आहेत.

म्हणजे लाभांमुळे तयार झालेला हा नवश्रीमंत वर्ग अन्य मागासांना लाभांपासून दूर ठेवत आहे. सावरकर म्हणत असत, हिंदू धर्मात प्रत्येक खालच्या जातीसाठी वरची जात ही ब्राम्हण असते. मागासांमध्ये पुन्हा जातींची उतरंड असते. सावकारी, कामकरी असे पोट प्रकार असतात. त्यामुळे त्यांच्यातही भेदाभेद होत असतो. भेदाभेद हा अमंगळ असला तरी त्याचे अस्तित्व दिसून येत असते. अगदी संतांनाही तो संपवता आला नाही, त्यामुळे त्या काळातही आंतरजातीय विवाह झालेले दिसत नाहीत. स्पर्धेत मागे पडले आहेत, त्यांनी पुढे येऊन मुख्य प्रवाहात सहभागी होण्यासाठी आरक्षणाचे प्रयोजन होते. पण अलीकडच्या काळात पाहिले तर जे वरच्या जातीतील लोक आहे, त्यांची आणखी खाली जाण्याची धडपड दिसून येते. त्यातून त्यांना आरक्षण मिळवायचे आहे. मागासांना अधिक मागास होऊन आरक्षणाचे अधिक लाभ मिळवायचे आहेत.

अशा वेळी जे अतिमागास आहेत, त्यांचा वाली कोण, असा प्रश्न पडतो. त्यांना तर आरक्षण म्हणजे नेमके काय आणि त्याचे फायदे कसे मिळवायचे हे माहीतही नाही, त्यांनी काय करावे? म्हणून न्या. भूषण गवई यांनी मांडलेल्या क्रिमी लेअरच्या नियमाचा संबंधितांनी प्रामाणिकपणे विचार करण्याची गरज आहे. मागासांच्या व्यापक हितासाठी न्या. गवई यांनी मांडलेला विचार खरोखरच भूषणावह आहे.

**- ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले**
**मु.पो.मासा बेलेवाडी**
**कागल-कोल्हापूर**

## अवरूध्द...

अधिवेशनस्वर्णसंधी
लढाईस पुढारीसिध्द
दोन स्पोटक गोदामा
मिळे इथेचं सानिध्य

येन केन प्रकारेण बा
नेत्यां व्हायचे प्रसिद्ध
यश आयतेप्रत्येकांस
मिळवा अ यत्नसिद्ध

काही गोंधळ घालती
जणूंहक्क जन्मसिद्ध
पर्वा नाही जरा सुद्धा
नियमकायदेही विध्द

विरोध कधीपराकोटी
पुढारी हो अति कृध्द
कृती नि भुमिका का
असते परस्परविरूद्ध

ताठर कसे राज्यकर्ते
तसूभर ना हले जिद्द
बलाढ्य बहुमत माते
बिनधास्त ओलंडेहद्द

संसदकामकाज चाले
सतत करता उपरूध्द
हट्टाहास जिरेस पेटते
बनतो रस्ता अवरूध्द

जाण हवी कर्तव्याची
जन सेवार्थ कटि बद्ध
आधीचं वेळसंकुचित
करायलाइप्सितसाध्य

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

## वाचक पत्र

# असे करा सुट्यांचे नियोजन !

नोव्हेंबर ते जानेवारी हे महिने विशेष पर्यटनाचे महिने असतात. सहलीची ठिकाणे या दिवसांत गजबजलेली असतात. नोकरी-व्यवसाय करणारी मंडळी खास सुट्या घेऊन मुलाबाळांसह या कालावधीत फिरायला जातात. यानिमित्ताने पर्यटन तर होतेच शिवाय नेहमीच्या धकाधकीच्या जीवनाला बाजूला करून वेगळे जीवन जगताना कुटुंबासाठीही वेळ देता येतो. कुटुंबासाठी घेतलेल्या सुट्टीचा उपयोग अनेकदा पालक केवळ मौजमजेसाठी करताना दिसतात त्यासाठी रिसॉर्ट, वॉटर पार्क किंवा थंड हवेच्या ठिकाणी जाण्याचा बेत आखला जातो. ज्यांच्या घरात शाळकरी मुले आहेत अशांनी सुट्यांचे नियोजन करताना पर्यटनासोबत मुलांच्या ज्ञानात कसा भर पडेल आणि या ज्ञानाचा उपयोग त्यांना शिक्षणातही कसा होईल याचाही विचार करायला हवा. आपल्या अद्वितीय पराक्रमाने, इच्छाशक्तीने आणि चातुर्याने इतिहास घडवणारे भारतातील महापराक्रमी राजे-महाराजे इतिहासाच्या पुस्तकातून मुलांना ज्ञात होतात. त्यांच्या पराक्रमांची साक्ष देणारे गड, दुर्ग, किल्ले यांची माहिती मिळते; मात्र ते जवळून



अनुभवण्यासाठी, त्यांच्या पराक्रमाच्या आणि बलिदानाच्या खुणा डोळ्यांनी पाहण्यासाठी, त्यांचे अद्वितीय शौर्य प्रत्यक्ष न्याहाळण्यासाठी मुलांना अशा ठिकाणी घेऊन जाण्यासाठी हीच नामी संधी असते. त्यादृष्टीने गड-किल्ले दर्शनाचा समावेश सुट्यांच्या नियोजनात करायला हवा. महाराष्ट ही साधू संतांची भूमी आहे. व्यवहार करताना परमार्थ कसा करावा याची शिकवण देऊन जीवनाचा उद्धार करण्याचा मूलमंत्र देणारी कितीतरी संत महंत मंडळी, अवतारी पूरूष महाराष्ट्रात होऊन गेली. त्यांच्या वास्तव्याने आणि सहवासाने पुलकित झालेली अनेक स्थाने महाराष्ट्रात आहेत. एरव्हीच्या धकाधकीच्या जीवनातून काहीकाळ बाजूला काढताना या चैतन्यमय ठिकाणी मुलांना घेऊन जाऊन त्यांच्यासह स्वतःही तेथील सात्त्विकतेचा लाभ घ्यायला हवा. महाराष्ट्रभूमी जशी साधुसंतांची भूमी आहे तशी अवतारांच्या पदस्पर्शाने पावन झालेली अध्यात्मिक भूमी म्हणूनही महाराष्ट्राची वेगळी ओळख आहे. अष्टविनायक, विविध शक्तिपीठे, ज्योतिर्लिंग या भूमीत वसली आहेत. या प्रत्येक क्षेत्राचा एक वेगळा इतिहास आहे. दूरचित्रवाहिनींवरील मालिका, ग्रंथ आणि इंटरनेट आदींच्या माध्यमातून आपण तो जाणून घेतलेला असतो. हा इतिहास जवळून जाणून घेण्यासाठी आणि तेथील चैतन्य आणि शक्ती अनुभवण्यासाठी अशा ठिकाणी कुटुंबासह जायला हवे. याशिवाय स्वातंत्र्यासाठी प्राणाचे बलिदान करणारे क्रांतिकारक, विचारवंत, समाज सुधारक यांच्या स्मारकांना भेट देऊन त्यांचे कार्य जाणून घेण्यासाठी घेतलेल्या सुट्टीचा उपयोग करता येईल. यंदाच्या सुट्ट्यांचे नियोजन करताना पालकांनी या गोष्टीही ध्यानात घेऊया !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

# पुण्यतिथीनिमित्त शालेय साहित्याचे वाटप!

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.०८, केज :** होळ गावाचे माजी सरपंच स्व. सुधाकरराव शिंदे यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांची सामाजिक कार्याची परंपरा जपत जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळा, होळ येथे शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, त्यांच्यात शैक्षणिक उर्मी वाढावी या हेतूने हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

स्व. शिंदे यांचे सुपुत्र संग्राम शिंदे यांनी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून आपल्या वडिलांच्या सेवाभावी कार्याची आठवण जपली.



शिक्षण क्षेत्रातील मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा असल्याची भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमासाठी ॲड. राजेश शिंदे, लक्ष्मण (तात्या) राख, रमेश कांबळे सर, राम शिंदे, श्रीमंत शिंदे यांसह शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मनापासून शिक्षण घेण्याचे आवाहन करत स्व. सुधाकरराव शिंदे यांच्या कार्याचा गौरव केला. शाळेच्या परिसरात विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. अशा सामाजिक उपक्रमांमुळे गावात शिक्षणाबद्दल सकारात्मकता निर्माण होते, असे शिक्षकांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन शाळेच्या शिक्षकांनी केले.

स्व. शिंदे यांच्या सामाजिक कार्याचा वारसा अशा उपक्रमांतून कायम जिवंत राहील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## संत संताजी जगनाडे महाराज यांना नमुंमपा मुख्यालयात अभिवादन




**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०८, नवी मुंबई :** महानगरपालिकेच्या वतीने संत संताजीजगनाडे महाराज जयंतीनिमित्त महापालिका मुख्यालयातील ॲम्फिथिएटर येथे प्रशासन विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे यांच्या शुभहस्ते, सहा.आयुक्त स्वरूपा पराळीकर, प्रशासकीय अधिकारी रवी जाधव व शोभा देशमुख, स्वच्छता अधिकारी मिलिंद आंबेकर व इतर अधिकारी, कर्मचारी यांच्या उपस्थितीत प्रतिमापूजन संपन्न झाले

संत तुकाराम महाराजांच्या अभंग गाथेचे लेखनिक तसेच त्यांच्या भजनातील श्रेष्ठ टाळकरी असलेल्या संत संताजी जगनाडे महाराजांनी 'तेलसिंधु', 'शंकरदीपिका', 'योगाची वाट' असे स्वतंत्र ग्रंथलेखनही केले आहे. त्यांच्या 'तेलसिंधु' ग्रंथातून त्यांनी तेलाच्या निर्मितीचा व व्यवसायाचा आध्यात्मिक संबंध दर्शवित अलौकिक प्रतिभेचे दर्शन घडविले आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

## पनवेल मनपाकडून संत संताजी जगनाडे महाराज यांना अभिवादन



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०८, पनवेल :** संत संताजी जगनाडे महाराज जयंती निमित्ताने आज महापालिका मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त अभिषेक पराडकर, उपायुक्त नानासाहेब कामठे, सामान्य प्रशासन किर्ती महाजन, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## मुदखेड तहसील कार्यालयात संत संताजी जगनाडे महाराज यांची ४०१ वी जयंती उत्साहात साजरी



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०८, मुदखेड (नांदेड)** मुदखेड तहसील कार्यालयात तेली समाज बांधव, महसूल प्रशासन आणि पत्रकारांच्या उपस्थितीत संत संताजी जगनाडे महाराज यांची ४०१ वी जयंती मोठ्या उत्साहाच्या वातावरणात साजरी करण्यात आली. तहसील कार्यालयात दि ८ डिसेंबर रोजी सकाळी ११:०० वाजता नायब तहसीलदार संतोष कामठेकर यांच्या शुभहस्ते संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले.

नायब तहसीलदार पाटे यांनी जगनाडे महाराजांच्या कार्याची माहिती सांगून त्यांच्या विचारांवर आधारित आचरण करण्याचे आवाहन केले.

यावेळी नायब तहसीलदार संतोष कामठेकर , नायब तहसीलदार पाटे, नायब तहसीलदार समीर पवने, अव्वल कारकून शाम चौधरी, गोविंद पानसरे, विनायकराव वच्छेवार, पत्रकार संघाचे जिल्हा सहसचिव ईश्वर पिन्नलवार, राम कूलपुवार, चंद्रकांत पिन्नलवार,गंगाधर पंगिरवार, शंकरराव पंगीरवार, शिवाजी पिन्नलवार , बालाजी आजगुळकर, शैलेश पंगिरवार, महेश पिनलवार, पत्रकार रूकमाजी शिंदे, प्रल्हाद मस्के, धम्मदाता कांबळे, अब्दुल रज्जाक यांच्यासह महिला व तेली समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कडाक्याच्या थंडीने पारनेर तालुका गारठला !



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, पारनेर (अहिल्यानगर) :** गेल्या काही दिवसांपासून वातावरणात बदल होवून वातावरणात प्रचंड गारवा वाढल्याने पारनेरकरांना हुडहुडी भरली आहे. त्यामुळे जपून ठेवलेले थंडीपासून संरक्षण करणारे उबदार साहित्य बाहेर काढले जात आहे. तर गावोगावच्या चौकाचौकात तर गल्लोगल्ली पुन्हा एकदा शेकोट्या पेटण्यास सुरुवात झाली आहे. वाढत्या थंडीमुळे सकाळी आणि सायंकाळी जीवन व्यवहारावर परिणाम होऊन दुपारी बाजारपेठेत मोठी गर्दी दिसून येते आहे. पहाटे जॉगिंग व व्यायामासाठी घराबाहेर पडणाऱ्यांची वर्दळ वाढली आहे. अनेक जण शेकोटीचा आधार घेणे पसंत करत असल्याचे चित्र दिसत आहे. अखेर थंडीचा महिना हळूहळू शेकोटी पेटवा असे म्हणण्याची वेळ आता नागरिकांवर आली आहे. या वर्षी मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्यानंतर शेतकरी खुशीत होते. पावसामुळे अनेक बंधारे,विहिरी भरली, ओढे नालेही भरून वाहिले गेल्याने भूगर्भातील पाण्याची पातळीही उंचावली आहे. त्यानंतर हिवाळा सुरू झाला. प्रारंभी काहीशी सुसह्य वाटणारी थंडी अचानक वाढली. हा पारा आता १० अंशापर्यंत घसरला आहे. जीवनमान गारठल्याने घरात ठेवून दिलेले स्वेटर, हातमोजे, पायमोजे,शाली, गोधडी,मफलर, स्कार्फ यासारखे साहित्य वापरण्यास सुरुवात झाली आहे. तर मोठ्या प्रमाणावर थंडी वाढत असल्याने या साहित्याची खरेदी करण्यासाठी दुकानांत गर्दी वाढत आहे. थंडीने या हंगामातील पिकांसाठी पोषक वातावरण निर्माण केले आहे. त्यामुळे आता शेतकरी हंगामासाठी सरसावला आहे. दरम्यान वाढत्या थंडीचा परिणाम दिसू लागल्याने तालुक्यातील ग्रामीण भागाबरोबरच शहरातील गल्लोगल्ली शेकोट्या पेटण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे तासनतास सुरक्षा म्हणून शेकोट्या भोवती गप्पागोष्टी तर काही शेकोट्यांभोवती राजकीय गप्पांचे फड रंगू लागले आहेत.

# कलगी तुऱ्याचा जल्लोष; गौरी गणेश जाखडी नृत्य स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद




**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०७, मुंबई :** अवघ्या कलाविश्वात लक्षवेधी ठरलेली कलगी तुरा समाज उन्नती मंडळ, मुंबई (महाराष्ट्र राज्य) आयोजित सुशांत गणेश जाबरे -संस्थापक (विभग फाउंडेशन) यांच्या विशेष सहकार्याने गौरी गणेश जाखडी नृत्य स्पर्धा-२०२५ तसेच कलगी तुरा दिनदर्शिका-२०२६ प्रकाशन आणि शाहीर गुणगौरव व विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गुणगौरव -पुरस्कार वितरण सोहळा रविवार दिनांक ०७ डिसेंबर २०२५ रोजी भारतरत्न लता मंगेशकर नाट्यगृह, दहिसर चेक नाका, महाजन वाडी, मीरारोड (पूर्व) मुंबई उपनगर येथे सुरेश ऐणारकर यांच्या अध्यक्षतेखाली, प्रमुख मान्यवर प्रमोद गांधी -उद्योजक/गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष-मनसे राहुल शिंदे -विभग फाउंडेशन कैलास धाडवे, समाज सेवक, ॲड दिपांजली कैलास धाडवे, प्रमिल पत्याने-उद्योजक, दिनेश कुरतडकर-समाज सेवक, रवींद्र मटकर- (अध्यक्ष न.लो.संस्था), ॲड राकेश रविंद्र साळुंखे -अध्यक्ष राष्ट्रवादी रत्नागिरी जिल्हा ओबीसी सेल, माधव कांबळे - (सहसेक्रेटरी) कुणबी समाजोन्नती संघ मुंबई आणि नारायण चापडे, पांडुरंग बाईत, रामचंद्र घाणेकर, अप्पा फडकले, कृष्णा जोगळे, विनोद फटकरे, विभग फाउंडेशन टीम यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

सरचिटणीस संतोष गोविंद धारशे सहसचिव सुधाकर शंकर मास्कर यांच्या रंगतदार निवेदनाने दिवसभर चाललेल्या ह्या सोहळ्यात मुख्यत्वे गौरी गणेश जाखडी नृत्य स्पर्धेत एकूण ८ नृत्य संघ सहभागी झाले होते. त्यातून विजेते झालेले संघ

**प्रथम क्रमांक:** धाकुनाथ नृत्य कला पथक-मु.पो.भातगाव तिसंग (वेलेवाडी ),गुहागर (रत्नागिरी),

**द्वितीय क्रमांक:** शिवशंभो नाच मंडळ (मांडवकरवाडी) मु. पो. कातवली, खेड (रत्नागिरी)

**तृतीय क्रमांक:** श्री जुगाई देवी नृत्य कालापथक, मु.पो.काजूर्ली,ता.गुहागर (रत्नागिरी) याप्रमाणे संघ सदर स्पर्धेत विजेते ठरले विजेत्या संचाना प्रथम पारितोषिक- ११,०००/-द्वितीय पारितोषिक -७,०००/- तृतीय पारितोषिक -५,०००/- सह प्रत्येकी विजेत्यांना आकर्षक स्मृतिचिन्ह,सन्मानपत्र व ढोलकी देऊन गौरविण्यात आले. त्याचबरोबर उत्कृष्ट गायक विजेते सुभाष बावदाने यांना करा ओके माईक तर उत्कृष्ट वादक विजेता ठरलेले नितेश वसंत लोखंडे यांस ढोलकी तसेच दोन्ही विजेत्यांना आकर्षक स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

सदर स्पर्धेचे परीक्षण करणारे परीक्षक यांनी नृत्य सादरीकरणाची अचूक परीक्षण करत शेवटच्या क्षणापर्यंत स्पर्धेची उत्सुकता वाढवली होती. यात परीक्षणाचे विभाग अंतिम करून परीक्षण नोंदवले जात होते.

सरपंच: सुरेश ऐनारकर, संतोष गोविंद धारशे

कविता विभाग: डॉ.सूर्यकांत दत्ताराम चव्हाण,अनंत तांबे, सुरेश कदम

नृत्य विभाग: चंद्रकांत गोताड, झराजी वीर, चंद्रकांत धोपट

रंगबाजी (विभाग-१ ): सुरेश चिबडे, अशोक पाटिल, सुरेश गंगाराम वीर

रंगबाजी (विभाग-२): दिलीप शंकर नामे,प्रकाश पाजणे,तुषार पंदेरे अशी नामवंत मंडळी परीक्षक म्हणून लाभली होती.

कलगी तुरा पुरस्कार २०२५-२६ ने शाहीर कलाकार आणि कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव त्याचबरोबर ह्या भव्यदिव्य सोहळ्यात कलगी तुरा लोककला संवर्धनासाठी योगदान देणारे जेष्ठ /युवा शाहीर तसेच सामाजिक, पत्रकारिता, कला, क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना कलगी तुरा पुरस्कार २०२५-२६ ने गौरविण्यात आहे. यामध्ये कलगी तुरा शाहीर पुरस्कार-२०२५-२६ ने गौरविण्यात आले.

असे शाहीर १) संजय रत्नाकर गोणबरे- मुंबई, २) आनंद भिकाजी कुळये (कोंडये तर्फ सोंदळ) राजापूर-रत्नागिरी, ३ )हिरु रामचंद्र भोस्तेकर-हार्डी, रोहा-रायगड, ४) योगेश महादेव कातकर-कासे. (पिंपळवाडी) संगमेश्वर-रत्नागिरी, ५) प्रकाश सुलोचना रामजी पाजणे -मालुक, तळा -रायगड, ६) अनंत सुरेश बावकर- खडकवली (कोतापूर)राजापूर-रत्नागिरी, ७) शरद गणपत कदम -(कासे - गुरववाडी) संगमेश्वर-रत्नागिरी,८) शाहिद आदम खेरटकर (खेड-रत्नागिरी), ९ ) अंकुश रामचंद्र गुरव- (कोचरी व्हाया शिपोशी) लांजा - रत्नागिरी, १० ) जयंत राजाराम चव्हाण- (मु.निवेखुर्द ) संगमेश्वर-रत्नागिरी, ११) शांताराम विठ्ठल मालप- निवळी-रत्नागिरी, कलगी तुरा उपासक पुरस्कार-२०२५-२६ :-प्रभाकर हरिश्चंद्र धनावडे- वाटद खंडाळा (कवठेवाडी) रत्नागिरी,

**कलगी तुरा आदर्श संपादक पुरस्कार-२०२५-२६:**

१ ) विनोद कैलास गोरे- (मुख्य संपादक) दैनिक अक्षराज मीडिया,(चव्हाली खु., आळंदी) पुणे, २ ) मुझम्मील मुश्ताक काझी-(संपादक) ग्रामीण वार्ता, उक्षी-रत्नागिरी,

**कलगी तुरा आदर्श पत्रकार पुरस्कार २०२५-२६:**

रघुनाथ भागवत- दै.पुढारी (चिंभावे) महाड-रायगड,

**कलगी तुरा आदर्श आयोजक पुरस्कार-२०२५-२६ :**

जय गणेश मित्र मंडळ -दिलीप नामे आणि सहकारी (मुंबई),

**कलगी तुरा स्वरध्वनी गौरव पुरस्कार-२०२५-२६:**

अनंत धोंडू बाईत-(अरविंद रेकॉर्डिंग स्टुडिओ) भांडुप-मुंबई, त्याच बरोबर संस्थेच्या वाटचालीस योगदान देणारे सहसचिव सुधाकर मास्कर-गुहागर, माजी सदस्य चंद्रकांत धोपट - रत्नागिरी यांचा सदर सोहळ्यात विशेष सन्मान करण्यात आला.

स्पर्धा यशस्वी होण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष सुरेश ऐनारकर, उपाध्यक्ष सुरेश चिबडे,सरचिटणीस संतोष धारशे, सहसचिव सुधाकर शंकर मास्कर, सहसचिव दिलीप शंकर नामे,खजिनदार सुरेश कदम, माजी.खजिनदार सत्यवान यादव, सदस्य: दामोदर गोरीवले, अनंत मुंगळे, दीपक म्हादे, निलेश जोगळे, संतोष पारदले, विश्वनाथ रत्ने, सचिन धुमक, प्रचार प्रमुख उदय दणदणे, माजी सदस्य चंद्रकांत धोपट आदी पदाधिकारी सदस्य यांनी अथक परिश्रम घेतले.

सुशांत गणेश जाबरे -संस्थापक/ अध्यक्ष (विभग फाउंडेशन) सत्यवान यादव, संतोष धारशे, समीर रेवाळे उपस्थित विभग फाउंडेशन टीम सुभाष प्रसाद, समीरभाई सय्यद, यशवंत निर्मल, करण गोसावी, हिराचंद्र पिचुर्ले, राजेश गोडांबे, मनोहर वाडकर, सुनील जाबरे, अरुण गोरीवाले, प्रशांत शिगवण सुशांत गणेश जाबरे -संस्थापक (विभग फाउंडेशन) यांच्या सौजन्याने सोहळ्याला समस्त उपस्थितांना स्नेहभोजनाची सोय करण्यात आली होती.

सदर भव्यदिव्य सोहळ्याला प्रमुख अतिथी-मान्यवर, कलाप्रेमी उपस्थित राहिल्याबद्दल क.तु. समाज उन्नती मंडळ-मुंबई संस्थेचे सरचिटणीस संतोष गोविंद धारशे यांनी आभार मानले आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरचिटणीस संतोष धारशे यांनी केले.

# तू स्त्रियांच्या विषयावर का बोलतो?

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.०८, सोलापूर :** तू पुरुष आहेस ना ?, मग बायकांच्या विषयावर का बोलतो ? यांसारखे अनेक प्रश्न समाज विचारत असताना, राहुल बिराजदार हा युवक थांबला नाही. त्याने राज्यातील वीसहून अधिक जिल्ह्यांत मासिक पाळी व लैंगिक शिक्षणावर मार्गदर्शन केले. यासोबत राज्यभर अनेक प्रशिक्षक घडविले.

बहुतांश शिक्षक हे लैंगिक शिक्षणाचा धडा शिकवत नाहीत. 'बी. एड'ला असतानाही राहुल बिराजदार यांच्या वर्गात हा धडा गाळण्यात आला, असे का ? हा प्रश्न राहुल यांना पडला. त्यांनी या प्रश्नाचे उत्तर शोधले नाही, तर सर्वांनाच या विषयाची माहिती देण्यासाठी चळवळ उभी केली.



एम.एस्सी. आणि बी.एड. शिक्षण पूर्ण करून, राहुल यांनी २०१६ पासून महिला आरोग्य आणि लैंगिक शिक्षण या क्षेत्रात कार्य सुरू केले. त्यांनी ब्लिड सेफली मोहिमेच्या माध्यमातून सम राजातील मासिक पाळीविषयी असलेले गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला. २०१७ ते २०२० दरम्यान त्यांनी 'देअर वर्ल्ड अवर्ल्ड ॲट स्कूल' या जागतिक संस्थेत ग्लोबल युथ ॲम्बेसिडर म्हणून भारताचे प्रतिनिधीत्व केले. राहुल हे किशोरवयीन मुलींसाठी मार्गदर्शन शिबिरे, कापडी पॅड बनवण्याचे प्रशिक्षण आणि महिला आरोग्यविषयक जनजागृती शिबिरे घेतात. महिला आरोग्य, स्वच्छता आणि लैंगिक शिक्षण या संवेदनशील विषयांवर निर्भयपणे संवाद घडवणारे राहुल बिराजदार हे अनेकांच्या विचारांमध्ये सकारात्मक बदल घडवत आहे. त्यांच्या या कामाची दखल घेऊन प्रिसिजन फाउंडेशनतर्फे त्यांचा प्रिसिजन सेवा पुरस्काराने गौरव केला.

**बाळा आधी 'पाळी'वर कुणी बोलत नव्हते रे !**

जनजागृतीसाठी गेल्यावर सुरुवातीला शाळा सत्रासाठी नकार दिला, मासिक पाळी विषयी माहिती देताना मुली माना खाली घालायच्या, सुरुवातीला कुटुंबीयांकडूनही या सामाजिक कामाला विरोध झाला. तरीदेखील काम सुरूच होते. एके दिवशी मार्गदर्शन झाल्यानंतर तिथे असलेल्या एका आजीने सांगितले की, छान माहिती दिली. आमच्या काळात असं पाळीवर कोणीही बोलत नव्हतं रे... तेव्हापासून अधिक आत्मविश्वास मिळाला. आता सर्वांनाच माझ्या कामावर अभिमान असल्याचे राहुल बिराजदार यांनी सांगितले.

# जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस तर्फे सशस्त्र सेना ध्वज दिनी विद्यार्थ्यांची अनोखी मानवंदना

**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.०८, खडकवासला (पुणे) :** भारताचा राष्ट्रध्वज तसेच लष्कर, नौदल आणि हवाई दलाच्या ध्वजांची भव्य प्रतिकृती न-हे येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस तर्फे साकारण्यात आली. भारत माता की जय च्या जयघोषात भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलाच्या कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी साज-या करण्यात येणा-या सशस्त्र सेना ध्वज दिनी ही अनोखी मानवंदना देण्यात आली.

संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उपक्रमात सहभाग घेतला. तब्बल ६० बाय ४० फूट आकारामध्ये हे ध्वज साकारण्यात आले होते. भारतीय सशस्त्र सेना ध्वज दिन भारतात दरवर्षी ७ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. देशाच्या सीमांचे




रक्षण तीन सैन्य करतात. भारतीय लष्कर ध्वज दिन प्रत्यक्षात लष्कर, नौदल आणि हवाई दलाच्या कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी साजरा केला जातो.

ॲड. शार्दुल जाधवर म्हणाले, सशस्त्र सेना ध्वज दिवस हा भारताच्या प्रत्येक सैनिकाचा आणि देशासाठी बलिदान देणाऱ्या शहीदांचा सन्मान करण्याचा दिवस आहे. भारतीय सशस्त्र दलातील जवानांच्या कल्याणासाठी भारतातील लोकांकडून निधी गोळा करण्यासाठी समर्पित करण्यात आलेला दिवस आहे. त्यामुळे यादिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी सैनिकांना अनोखी मानवंदना दिली आहे.

# लोककल्याणकारी योजनांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही - मुख्यमंत्री फडणवीस

## हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला पत्रकार परिषद : १८ विधेयके मांडली जाणार

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०८, मुंबई :** मराठवाडा आणि विदर्भातील सर्वच महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यास शासन तयार आहे. राज्यात सद्यस्थितीत राबविण्यात येत असलेल्या लोककल्याणकारी योजनांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशी ग्वाही देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे अधिवेशन जनतेच्या आशा आकांक्षा पूर्ण करणारे ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर रामगिरी या शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, इतर मागासवर्ग, बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, वित्त राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था देशातील मोठ्या राज्यांमध्ये सर्व निकषांत अग्रेसर असणारी अर्थव्यवस्था आहे. राज्यात पुरामुळे नुकसानग्रस्त झालेल्या सुमारे ९२ टक्के म्हणजेच ९० लाखांहून अधिक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात आली आहे.

केवायसी (KYC) प्रक्रियेमुळे राहिलेल्या उर्वरित शेतकऱ्यांनाही लवकरच मदत देण्यात येईल. अतिरिक्त १० हजार रुपयांची मदत तसेच खरडून गेलेल्या जमिनी, विहिरी आदींसाठी स्वतंत्र मदत दिल्याची माहिती ही त्यांनी यावेळी दिली.शनिवार व रविवार सुटीच्या दिवशीही कामकाज करण्यात येणार आहे. नागपूर अधिवेशनात दररोज १० तासांहून अधिक कामकाज करण्याचा शासनाचा प्रयत्न राहील. या अधिवेशनात १८ विधेयके मांडली जाणार असून विदर्भ आणि मराठवाड्याशी संबंधित अधिकाधिक प्रश्नांवर चर्चा होईल, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. दावोससह विविध मंचांवर झालेले गुंतवणूक करार मोठ्या प्रमाणावर प्रत्यक्षात येत असून हे उद्योग महाराष्ट्रात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

**नागरिकांचे प्रश्न सोडवणे हाच शासनाचा अजेंडा - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

शासनाने लोकाभिमुख आणि कल्याणकारी निर्णय घेतले आहेत. अधिवेशनात विदर्भ आणि मराठवाड्याच्या प्रश्नांवर प्राधान्याने चर्चा करण्यात येणार



असून नागरिकांचे प्रश्न सोडवणे हाच शासनाचा अजेंडा असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, विदर्भ तसेच मराठवाड्यातील शेती, सिंचन, आरोग्य, रोजगार निर्मिती यासह सर्वच महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात येईल. विदर्भात अधिवेशन होत असल्याने येथील प्रश्नांवर चर्चा करून न्याय देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. जीडीपी, स्टार्टअप, विदेशी गुंतवणूक आदींमध्ये महाराष्ट्र अग्रेसर असल्याचे सांगून देशात सर्वात जास्त पायाभूत सुविधांचे प्रकल्प महाराष्ट्रात सुरू आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशाची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलर करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या उद्दिष्टपूर्तीमध्ये महाराष्ट्र कुठेही कमी पडणार नाही, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**महाराष्ट्र विधिमंडळ हिवाळी अधिवेशन २०२५प्रस्तावित विधेयके : -**

(१) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ (विधि व न्याय विभाग)

(२) महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५ (उद्योग, ऊर्जा कामगार व खनिकर्म विभाग)

(३) महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५ (सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग)

(४) महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५ (महसूल व वने विभाग)

(५) मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२५ (नगर विकास विभाग)

(६) महाराष्ट्र ग्रामपंचायत व महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती, (सुधारणा) विधेयक, २०२५ (ग्राम विकास विभाग)

(७) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ (महसूल व वने विभाग)

(८) महाराष्ट्र जन विश्वास विधेयक, २०२५ (सामान्य प्रशासन विभाग)

(९) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५ (विधि व न्याय विभाग)

(१०) महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५ (महिला व बालविकास विभाग)

(११) महाराष्ट्र (तिसरी पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२५ (वित्त विभाग).

(१२) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये सुधारणा विधेयक (उच्च व तंत्रशिक्षण)

(१३) मराठवाडा विभागातील इनाम जमिनींना लागू असलेल्या हैद्राबाद इनाम निर्मूलन व रोख अनुदान अधिनियम १९५४ मध्ये सुधारणा (महसूल विभाग).

सभागृहाच्या पटलावरती ठेवण्यात येणारे अध्यादेश : -

(१) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अध्यादेश, २०२५ (विधि व न्याय विभाग)

(२) महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२५ (उद्योग, ऊर्जा कामगार व खनिकर्म विभाग)

(३) महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२५ (सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग)

(५) महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) अध्यादेश, २०२५ (महसूल व वने विभाग)

(६) मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२५ (नगर विकास विभाग)

(७) महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०२५ (ग्रामविकास विभाग)

# वनविभागाच्या दारात दशक्रिया विधी करू; किन्ही ग्रामस्थांचा संताप

## नरभक्षक बिबट्याला ठार मारण्याची परवानगी द्या; आंदोलनकर्त्यांची मागणी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्याच्या पठार भागातील बिबट्याच्या सतत होणाऱ्या हल्ल्यांमुळे निर्माण झालेल्या दहशतीला कंटाळून दि.०७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता नगर-कल्याण महामार्गावरील तिखोल फाटा येथे शेकडो ग्रामस्थ व शेतकरी व महिला यांनी रस्ता रोको आंदोलन केले. सुमारे ४५ मिनिटे महामार्ग पूर्णपणे ठप्प झाला होता. गावे बिबट्यामुक्त करावीत व मृत महिलेच्या कुटुंबीयांना तात्काळ आर्थिक मदत देण्याची मागणी आंदोलन करणाऱ्यांनी केली.

गेल्या दिनांक ०२ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी किन्ही येथील ७० वर्षीय भागुबाई विश्वनाथ खोडदे या वृद्ध महिलेवर त्यांच्या शेतात काम करत असताना बिबट्याने अचानक हल्ला केला. या हल्ल्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. ही तालुक्यातील पठार भागातील दुर्दैवी घटना ठरली आहे. या पूवही कान्हूर पठार, बहिरोबावाडी, हिवरे कोरडा परिसरात बिबट्याच्या हल्ल्यांच्या घटना घडल्या आहेत. परिणामी किन्ही, करंडी, तिखोल, बहिरोबावाडी, कान्हूर पठार, गोरेगाव, हिवरे कोरडा, काकणेवाडी या गावांमध्ये भीतीचे वातावरण आहे. संध्याकाळनंतर कोणीही घराबाहेर पडण्यास धजावत नाही. त्यामुळे पठार भागावरील शेतकरी नेते अनिल देठे यांच्या नेतृत्वाखाली तिखोल फाट्यावर रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.



**तर दशक्रिया विधी वनविभागाच्या कार्यालयात करू**

भागुबाई खोडदे या बिबट्याच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या दुर्दैवी महिलेचा दशक्रिया विधीच्या आता खोडदे कुटुंबीयांना आर्थिक मदत मिळावी व नरभक्षक बिबट्याला पकडावे अन्यथा खोडदे यांचा दशक्रिया विधी पारनेर येथिल वन विभागाच्या कार्यालयात करू असा इशाराच आंदोलनकर्त्यांनी रस्ता रोको आंदोलनावेळी दिला आहे.

या आंदोलनात महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. सर्वपक्षीय नेते व शेतकरी संघटनांनी एकदिलाने पाठिंबा दिला. राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, शिवसेना तालुकाध्यक्ष डॉ. श्रीकांत पठारे, शेतकरी नेते अनिल देठे, राष्ट्रवादीचे नेते दीपक लंके, ज्येष्ठ नेते मारुती रेपाळे, जाणता राजा प्रतिष्ठानचे अध्यक्ष किरण ठुबे, अमोल उगले, शिवाजी खोडदे, दत्तात्रय ठाणगे, आप्पासाहेब नऱ्हे, बाबासाहेब नऱ्हे, गणेश तांबे, प्रतिक ठाणगे आदी मान्यवर आंदोलनात सहभागी झाले होते.

राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत म्हणाले की, किन्ही येथील घटना ही दुर्दैवी असून अशा घटना तालुक्यात वारंवार घडत आहेत. बिबट्यांची संख्या तालुक्यात वाढली आहे. आता प्रशासनाच्या विरोधात सर्वसामान्य नागरिक म्हणून रस्त्यावर उतरावे लागेल आणि न्याय मागण्यासाठी जेलमध्ये जाण्याची वेळ आली तरी मागे हटणार नाही. राष्ट्रवादीचे नेते दिपक लंके म्हणाले बिबट्यांच्या बंदोबस्तासाठी परिसरात रेस्क्यू टीम आवश्यक आहे. प्रशासनाने या संदर्भात कार्यवाही करून खोडदे कुटुंबीयांना न्याय द्यावा व बिबट्यांचा बंदोबस्त करावा.

किरण ठुबे म्हणाले की, पठार भागावर बिबट्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली असून हल्ले वाढले आहेत. या घटना दुर्दैवी असून सरकारला माणसे हवेत की बिबटे असे म्हणत त्यांनी वनविभागाला धारेवर धरले. यावेळी आंदोलकांनी वन विभागाच्या निष्क्रियतेचा तीव्र निषेध केला आणि जोपर्यंत ठोस कारवाई होत नाही तोपर्यंत आंदोलन तीव्र करु,असा इशारा दिला. प्रशासनाने तात्काळ पिंजरे लावणे, ट्रँक्विलायझर पथक बोलवणे आणि नुकसानभरपाई देण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

# लोहगाव येथील एसबीआय बँकेच्या शाखेचे स्थलांतर थांबवा - काँग्रेस पक्षाची मागणी

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०८, नांदेड :** बिलोली तालुक्यांतील लोहगाव येथील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेचे स्थलांतर करण्याच्या हालचालीची चर्चा होत आसुन तरी या भागातील खातेदारांची गैरसोय लक्षात घेऊन वरीष्ठानी स्थलांतरांचा निर्णय मागे घ्यावा. अशी मागणी तालुका काँग्रेस पक्षाच्या वतीने एका निवेदनाद्वारे तहसीलदार यांच्याकडे करण्यात आली.

बिलोली तालुक्यांतील लोहगाव हे गाव जवळपास ७ ते ८ हजार लोकवस्तीचे असून या ठिकाणी अनेक छोटी-मोठे व्यावसायिक असून या शाखेस या भागात जवळपास १५ ते २० गांवचा समावेश असून अनेक व्यवसायिकांनी बरोबर शेतकरी मोठया संख्येनी या बँकेशी नाळ जोडल्या गेलेली आहे.

तरी ही शाखा या भागातील खातेदारांनासाठी अत्यंत महत्त्वाची असून भविष्यात या शाखेशी जोडल्या गेलेल्या खातेदारांची व जनतेची होणारी गैरसोय लक्षात घेऊन या शाखेचे इतरत्र स्थलांतर न करता येथेच कायमस्वरूपी असावी अशी मागणी बिलोली तालुका काँग्रेस पक्षाच्या वतीने आज दि.८ डिसेंबर सोमवार रोजी बिलोलीचे तहसीलदार गजानन शिंदे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली.

यावेळी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष प्रा.शिवाजी पाटील पाचपिपळीकर, दिलीप पांढरे,राजु पा. शिंपाळकर,पांडुरंग पा.रामपुरे, तिरुपती पा. हिवराळे, माधव पा. नरवाडे, हाणमंत नरवाडे, नरसिंग मोंडेवाड, सयाराम निदाने, प्रल्हाद वानोळे, आनिल तोटावाड, सुर्यकांत नरवाडे,यांच्यासह अनेकांच्या सहयांचे निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

# थोडक्यात

## कुकडी डावा कालवा आवर्तन तातडीने सोडा

### आ.दातेंची जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांचेकडे मागणी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, पारनेर (अहिल्यानगर) :** कुकडी डावा कालवा लाभक्षेत्रातील शेतकरी वर्ग सध्या हिवाळी हंगामात मोठ्या प्रमाणात कांदा लागवड करीत असून, ही लागवड योग्य वेळी व सुरक्षितरीत्या यशस्वी होण्यासाठी आवश्यक त्या प्रमाणात सिंचन पाण्याची उपलब्धता अत्यंत महत्त्वाची आहे. कुकडी डावा कालवा आवर्तन तातडीने सुरू करण्याची मागणी शेतकऱ्यांची गेल्या काही दिवसांपासून होत असताना या गंभीर प्रश्नाची दखल घेत आमदार काशिनाथ दाते सरांनी वैयक्तिक पुढाकार घेत जलसंपदा मंत्री तसेच अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे तातडीने पाठपुरावा केला.

या मागणीची गांभीर्याने नोंद घेत मंत्र्यांनी कुकडी सिंचन मंडळाच्या अधीक्षक अभियंता श्रीम. अलका अहिरराव यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधत आमदार दाते यांच्याशी चर्चा करून आवर्तन बाबत त्वरित कार्यवाहीचे निर्देश दिले. कुकडी सिंचन मंडळाच्या अधीक्षक अभियंता अलका अहिरराव यांच्याशी संपर्क केला असता आवर्तन हे दि. १५ डिसेंबर २०२५ रोजी सोडण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र कालवा दुरुस्तीची कामे प्रगतीत असल्याने आवर्तन सोडण्यात अडचण निर्माण झाली आहे. सदर दुरुस्तीची कामे २० डिसेंबरपर्यंत पूर्ण करणे अपेक्षित आहे. त्यामुळे २० ते २५ डिसेंबर दरम्यान आवर्तन सोडण्यात येईल असे अधीक्षक अभियंता अहिरराव यांनी मान्य केले आहे. कांदा हंगाम हा पारनेर तालुक्याच्या अर्थव्यवस्थेसाठी कणा आहे. शेतकऱ्यांच्या पिकांना पाणी उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची तातडीची जबाबदारी आहे. कालवा आवर्तन वेळेत सुरू व्हावे. म्हणून आम्ही सातत्याने पाठपुरावा करीत आहोत.

## बल्लारपुरात लोखंडी देशी कट्ट्यासह एका व्यक्तीस अटक

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, बल्लारपूर (चंद्रपूर) :** स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर पथकाने मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस स्टेशन बल्लारपूर हद्दीत सापळा रचून दिनांक ०७ डिसेंबर २०२५ रोजी सलमान उर्फ राज सलीम खान (वय ३२, रा. भगतसिंग वार्ड, बल्लारपूर) या इसमाला ताब्यात घेतले. तपासादरम्यान, त्याच्याकडून अवैधरित्या बाळगलेला देशी बनावटीचा लोखंडी देशी कट्टा (किंमत अंदाजे ₹८,०००/-) जप्त करण्यात आला. या प्रकरणी पोलीस स्टेशन बल्लारपूर येथे अपराध क्रमांक १०१५/२०२५ नोंदवून आरोपीवर कलम ३, २५ भारतीय हत्यार कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास बल्लारपूर पोलीस करीत आहेत. स्थानिक गुन्हे शाखेच्या या कारवाईमुळे अवैध शस्त्र बाळगणाऱ्या गुन्हेगारांना धडा मिळाला असून परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा संदेश देणारी ही कारवाई ठरली आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन व अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूरचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वाखालील पथकात सपोनि बलराम झाडोकार, पोउपनि सर्वेश बेलसरे, पोहवा जयसिंग, सचिन गुरनुले, संतोष येलपुलवार, पोअं. नितीन रायपुरे, शेखर माथनकर, शशांक बादामवार, चापोहवा प्रमोद डंभारे, दिनेश अराडे यांनी मोलाची भूमिका बजावली.

## मंत्री रावल यांची व्यापारी कृती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८ :** महाराष्ट्र कृषी पणन (विकास व विनियमन) नियम १९६३ दुरुस्त्यांबाबत पणन मंत्री जयकुमार रावल यांनी व्यापारी कृती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात आढावा घेतला. राज्यातील मोठ्या बाजार समित्यांना 'राष्ट्रीय बाजार समित्या' म्हणून श्रेणीउन्नत करुन शेतकऱ्यांच्या शेतीमालास आतंरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून दिली जाईल, असे श्री.रावल यांनी यावेळी सांगितले. तालुकास्तरावरील कृषी उत्पन्न बाजार समित्या ह्या शेतकऱ्यांचा शेतीमाल विक्री करण्याचे हक्काचे ठिकाण आहे. शेतकरी-व्यापारी-मापारी-हमाल या साखळीच्या माध्यमातून विक्री प्रक्रिया चालते. ही साखळी अशीच अबाधित राहण्यासाठी व्यापाऱ्यांनी बाजार समितीसोबत समन्वयाने कार्य करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी उत्पादित शेतीमालास राज्य, देश व आंतरराष्ट्रीय स्तरावर बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी विभागाव्दारे मुंबई येथे मोठे हब निर्माण करण्याचे नियोजन आहे. त्याच्या माध्यमातून रेल्वे, भूमार्ग व समुद्री मार्गाने उत्पादित मालास सर्वस्तरावर बाजारपेठ उपलब्ध करुन दिली जाईल, असेही श्री. रावल यावेळी म्हणाले.यावेळी पणन महामंडळाचे संचालक संजय कदम, पणन सहसचिव विजयकुमार लहाने, सहसंचालक राजेंद्र तराळे यांच्यासह राज्यातील व्यापारी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## अनुसयाबाई धबडगे यांचे निधन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड येथील जेष्ठ महिला नागरिक श्रीमती अनुसयाबाई बाबाराव धबडगे पाटील यांचे दि.८ डिसेंबर रोजी दुपारी ३:३० वाजता वृद्धपकाळाने निधन झाले आहे.त्यांचे मृत्यू समयी वय ९१ वर्ष होते. त्यांच्या पार्थिव देहावर मंगळवार, दि.९ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता बारड रोडवरील सितानदी हिंदु स्मशानभूमीत मुदखेड येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे त्यांच्या पश्चात चार मुले व एक मुलगी नातवंडे असा मोठा परिवार आहे. येथील प्रसिद्ध व्यापारी रंगराव धबडगे, शिवाजी धबडगे, भगवानराव धबडगे,सखाराम धबडगे, यांच्या त्या मातोश्री होत्या पत्रकार गंगाधर डांगे व भाजपाचे देवा पाटील धबडगे यांची त्या आजी होतं.